।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## EXAMINATION SECTION

**Phone: (02462) 229294** **website: srtmun.ac.in** **e-mail: srtmuncoe@gmail.com**


संदर्भ : परीक्षा/2018–19/1824-25 दिनांक : 18/12/2018

## परिपत्रक

या परिपत्रकान्वये सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाची आठवी पीएच्. डी. प्रवेशपूर्व परीक्षा (पेट–2018) दिनांक 21/10/2018 रोजी घेण्यात आली. ही परीक्षा तीन बॅचेसमध्ये घेण्यात आली. या परीक्षेच्या पहिल्या बॅच मध्ये (बी 1) सेक्शन 'ए' (रिसर्च मेथडॉलॉजी) या विषयाच्या परीक्षेच्यावेळी तांत्रिक अडचण झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

हि बाब मा. परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आली असता दिनांक 21/10/2018 रोजी संपन्न झालेल्या पीएच्.डी. प्रवेशपूर्व परीक्षा (पेट–2018) यातील पहिल्या बॅच (बी 1) मधील सर्व उपस्थित विद्यार्थ्यांची केवळ सेक्शन 'ए' (रिसर्च मेथडॉलॉजी) या विषयाची पुनर्परीक्षा घेण्याचा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार बॅच बी 1 मधील परीक्षार्थ्यांच्या सेक्शन 'ए' (रिसर्च मेथडॉलॉजी) या विषयाची पुनर्परीक्षा दिनांक 06/01/2019 रोजी सकाळी 10.00 ते 11.00 या वेळात घेण्यात येईल.

दिनांक 21/10/2018 रोजी झालेल्या परीक्षेस जे परीक्षार्थी उपस्थित होते त्यांनाच ही परीक्षा देता येईल तसेच यापूर्वी जे परीक्षा केंद्र होते त्याच केंद्रावर सदर परीक्षा ऑनलाईन ऑनस्क्रिन पध्दतीने घेण्यात येईल. एकुण 50 बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा होईल. पीएच्.डी. प्रवेशपूर्व परीक्षा (पेट–2018) साठी यापूर्वी प्रसिध्द केलेल्या माहितीपुस्तिकेतील सर्व नियम व अटी या परीक्षेसाठी लागू आहेत.

सदर पुनर्परीक्षेसाठी नविन अर्ज किंवा परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. या परीक्षेचे प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगईन आयडी वर पाठविण्यात येतील. वरील दिनांक 06/01/2019 रोजीची परीक्षा संपन्न झाल्यानंतर पेट–2018 परीक्षेच्या सर्व बी 1, बी 2 व बी 3 बॅचचे सर्व विद्यार्थ्यांचे निकाल लवकरच जाहीर करण्यात येतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :

1. मा. कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ
2. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ